# बारावी पंचवार्षिक योजना आणि भारतीय अर्थव्यवस्था


## डॉ. पंडित मुळे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

शिरुर कासार, जि. बीड

Email : mulepm@gmail.com


रोल नं. ४५

# प्रस्तावना

राष्ट्राचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी व आर्थिक व्यवहाराची योजनाबद्ध आखणी करण्यासाठी नियोजनाची गरज असते. भारतासारख्या विकसनशील देशात अनेक आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करणे गरजेचे आहे. ज्यात नियोजनाची भूमिका महत्त्वाची ठरते. वाढत्या लोकसंख्येला अर्थव्यवस्थेत सामावून घेणे, शेतीक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा वाढविणे, आरोग्याच्या सोयी सर्वांपर्यंत पोहचविणे या कायासाठी नियोजन करणे गरजेचे आहे. भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून नियोजनबद्ध पद्धतीने आर्थिक विकास करण्याचे धोरणा स्वीकारले.

# व्याख्या

- अर्थव्यवस्थेतील उपलब्ध साधनसामुग्रीचा कार्यक्षम वापर करून काही उद्दिष्ट विशिष्ट कालावधीत पूर्ण करण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे आर्थिक नियोजन होय.

१९३४ मध्ये विश्वेश्वरया यांनी planned Economy for India मध्ये त्यांनी असे म्हटले नियोजन करा किंवा विनाशास तयार व्हा. १९४४ मध्ये मुंबईतील मुख्य आठ उद्योगपतीने बॉम्बे योजना तयार केली. १९४५ मध्ये एम.एन. रॉय यांनी People's Plan तयार केली. जानेवारी १९५० मध्ये जयप्रकाश नारायण यांनी सर्वोदय योजना तयार केली. यातील अंश घेऊन १५ मार्च १९५० मध्ये योजना आयोगाची स्थापना करण्यात आली. पंतप्रधान योजना आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. आतापर्यंत भारताने ११ पंचवार्षिक योजना पूर्ण केल्या असून सध्या बारावी पंचवार्षिक योजना सुरू आहे. १ एप्रिल २०१२ ते ३१ एप्रिल २०१७. बाराव्या पंचवार्षिक योजनेत नियोजन मंडळाने दोन प्रकारचे किमान ९.००% आणि कमाल ९.५% विकासाचे लक्ष निश्चित केले आहे. क्षेत्र निहाय नवव्या, दहाव्या, आकराव्या, योजनेच्या विकास दराचाही आढावा घेण्यात आला आहे.

# बाराव्या पंचवार्षीक योजनेची उदिष्टे - १

- बाराव्या पंचवार्षीक योजने अंतर्गत विकास दराचे लक्ष ९% पूर्ण करणे.
- बाराव्या पंचवार्षीक योजने अंतर्गत विकास दराचे लक्ष ९.५% पर्यंत वाढविणे.
- विकासाचा दर ९% वाढविण्यासाठी कृषी, विद्युत ,गॅस, वायु पाणी पुरवठा यामध्ये गतिशीलता आणाने आवश्यक आहे.
- विकासाचा दर ९.५% वाढविण्यासाठी कृषी ,विद्युत, गॅस पाणी पुरवठा यामध्ये अतितीव्र गतीशिलता आणणे आवश्यक आहे.


# बाराव्या पंचवार्षीक योजनेची उदिष्टे - २

- गुंतवणुकीच्या साधनांची गतिशीलता वाढविणे.
- पायाभूत सोयी-सुविधा खाजगी व सार्वजनिक क्षेत्राच्या माध्यमाने उच्च गुंतवणुक वाढविणे सार्वजनिक साधनांचा कार्यक्षम वापर करणे.
- गतिशील पिढीला समायोजित करण्यासाठी रोजगार वृध्दीसाठी कौशल्यात वृध्दी घडवून आणणे.
- उच्च शिक्षणातील ग्रामीण -शहरी लैंगिक विषमतेची दरी कमी करणे.

# बाराव्या योजनेतील क्षेत्रनिहाय विकासाची उद्दिष्ट्ये व इतर योजनेची तुलना


| अ.क्र. | क्षेत्र | नववी योजना साध्य | दहावी योजना साध्य | अकरावी योजना साध्य | बारावी योजना | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | लक्ष्य किमान | लक्ष्य कमाल |
| १. | कृषी, वने व मत्सव्यवसाय | २.५ | २.३ | ३.२ | ४.० | ४.२ |
| २. | खान आणि वाळू उद्योग | ४.० | ६.० | ४.७ | ८.० | ८.५ |
| ३. | उत्पादक | ३.३ | ९.३ | ७.७ | ९.८ | ११.५ |
| ४. | वीज, गॅस व पाणी पुरवठा | ४.८ | ६.८ | ६.४ | ८.५ | ९.० |
| ५. | बांधकाम | ७.१ | ११.८ | ७.८ | १०.० | ११.० |
| ६. | व्यापार, हॉटेल, रेस्टारंट, वाहतुक, साठवण, संदेशवहन | ८.० | ११.२ | ९.९ | ११.० | ११.२ |
| ७. | वित्त, विमा, वास्तव संपत्ती आणि व्यापारी सेवा | ८.० | ९.९ | १०.७ | १०.० | १०.५ |
| ८. | सामुदायिक सामाजिक व वैयक्तिक सेवा | ७.७ | ५.३ | ९.४ | ८.० | ८.० |
| ९. | उद्योग | ४.३ | ९.४ | ७.४ | ९.६ | १०.९ |
| १०. | सेवा क्षेत्र | ७.९ | ९.३ | १०.० | १०.० | १०.० |

# आलेख - १



कृषी, वने व मत्सव्यवसाय
खान आणि वाळू उद्योग
उत्पादक
वीज, गॅस, व पाणी पुरवठा
बांधकाम
नववी
दहावी
अकरावी
बारावी

# आलेख - २



नववी
दहावी
अकरावी
बारावी
व्यापार, हॉटेल रेस्टारंट, वाहतुक साठवण, संदेश वहन
वित्त, विमा, वास्तव संपत्ती आणि व्यापारी सेवा
सामुदायिक व सामाजिक वैयक्तिक सेवा
उद्योग
सेवा क्षेत्र

# बाराव्या व इतर योजनेची तुलना

## १. कृषी वने व मत्स्यव्यवसाय (Agricultural Forestry and Fishery)

बाराव्या पंचवार्षिक योजनेत क्षेत्रनिहाय विचार केला आसता किमान ४ व कमाल ४.२% विकास दर गाठण्याचे ठरविले आहे. जे नवव्या, दहाव्या, अकराव्या योजनेत अनुक्रमे २.५%, २.३% व ३.२% होते जे अत्यल्प स्वरुपाचे होते.

## २. खाण आणि वाळू उद्योग (Meaning of Quarring)

प्रस्तुत क्षेत्रसाठी योजनेत किमान ८% व कमाल ८.५ % विकास दराचे लक्ष निश्चित केले आहे. जे पूर्वीच्या तीनही योजनेत अनुक्रमे ४%, ६%, ४.७%, होते जे कृषी वने मत्स्यव्यवसायापेक्षा अधिक आहे.

## ३. उत्पादक (Manufacturing)

उत्पादक क्षेत्रात किमान ९.८%, व कमाल ११.५% विकासदाराचे लक्ष निश्चित केले आहे. जे वरील दोन्ही क्षेत्रापेक्षा अधिक्याचे आहे. या पूर्वी मागील ९, १०, ११ व्या योजनेत ते अनुक्रमे ३.३%, ९.३%, ७.७% होते अर्थात दहाव्या योजनेत उत्पादक क्षेत्राचे प्रमाण नव्या व अकराव्या योजनेपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. परंतु बाराव्या पंचवार्षिकयोजनेत या क्षेत्रात जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध होईल अशी अपेक्षा नियोजन मंडळानी केली आहे.

## ४. विज, गॅस व पाणीपुरवठा (Electricity, Gas and water Supply)

बाराव्या योजनेत या क्षेत्रासाठी किमान ८.५ % व कमाल ९.१% लक्ष्य निश्चित केलेले आहे. यापूर्वीच्या तीन्ही योजना कालावधीत अनुक्रमे ४.८%, ६.८% आणि ६.४% होते. बाराव्या पंचवार्षिक योजना कालावधीमध्ये महाराष्ट्रात जैतापूर येथे अणुउर्जा प्रकल्प उभारला जात आहे. ज्यातून महाराष्ट्राचीच नव्हे तर देशाची विजेची गरज भागविणे हे नियोजनकाराचे लक्ष्य आहे.

## ५. बांधकाम (Construction)

बाराव्या पंचवार्षिक योजनेत किमान १०% व कमाल ११ % विकासदर निश्चित केला आहे. यापुर्वीच्या ९,१०, व ११ व्या योजनेत अनुक्रमे ७.१%, ११.८% व ७.८% विकासदर गाठला होता. दहाव्या पंचवार्षिक योजनेत ११.८% विकासदर नवव्या व आकराव्या योजनेपेक्षा जास्त आहे.

## ६. व्यापार हॉटेल रेस्टॉरंट,वहातूक, साठवण, संदेशवहन

## (Trade, Hotel,Restorents, Transport, Storage, Communicution)

बाराव्या पंचवार्षीक योजनेत या क्षेत्रात किमान ११% व कमाल ११.२ % विकासाचे लक्ष्य निश्चित केलेले आहे. या पुर्विच्या तीनही योजनेत अनुक्रमे ८%, ९.९% व १०.७ % विकास दर साध्य केलेला आहे.

## ७. वित्त, विमा, वास्तव संपत्ती आणि व्यापारी सेवा

## (Financing,Insurance,Real Estate and Business Services)

बाराव्या योजनेत या क्षेत्रात किमान १०% व कमाल १०.५% विकास दर निश्चित केलेला आहे. जो मागील योजना कालावधीमध्ये अनुक्रमे ८,%, ९.९ % आणि १०.७% विकास दर भारतीयांनी या क्षेत्रात गाठला आहे.

## ८. सामुदायिक, सामाजिक व वैयक्तिक सेवा : (Community,Social and Services)

बाराव्या योजनेत या क्षेत्रात कमाल व किमान विकासाचा वृध्दिदर ८%अपेक्षीत आहे. मागील तीनही योजनेत अनुक्रमे ७.७%,५.३% आणि ९.४% विकास दर गाठला आहे. ग्रामीण विकास व सर्व समावेशक विकास साध्य करायचा असेल तर विकासदर १०% करणे गरजेचे आहे.

## ९. उद्योग (Industry)

बाराव्या योजनेसाठी नियोजीत्त विकास दर अनुक्रमे किमान ९.६% व कमाल १०.९.% निश्चित करण्यात आलेला आहे. नवव्या, दहाव्या, अकराव्या योजना कालावधीमध्ये उद्योग क्षेत्राचा विकास दर अनुक्रमे ४.३% ९.४% व ७.४% होता.

## १०. सेवा क्षेत्र (Service Sector)

बाराव्या पंचवार्षिक योजनेत किमान व कमाल विकास दर १०% निश्चित करण्यात आलेला आहे. मागील तिन्हीही योजना कालावधीमध्ये उद्योग क्षेत्राचा विकास दर ७.९%, ९.०%, व १०% राहिला आहे. सेवा क्षेत्राचा तृतीय प्राथमिक दुय्यम क्षेत्राच्या तुलनेत मोठा वाटा वाढताना दिसतो आहे. परंतु बाराव्या पंचवार्षी योजनेत १०% च्या एवजी १२% लक्ष नियोजित करणे आवश्यक होते.

# निष्कर्ष

- बाराव्या पंचवार्षी योजनेत केंद्रीकरण व सबलीकरणसाठी गतिमान,वृध्दी सर्व समावेशकता आणि चिरंतन विकास घडवून आणण्यासाठी भारतीयांच्या क्षमतेत वाढ करणे गरजेचे आहे.
- भारत सरकारकडे उपलब्ध असणारे उत्पन्नाची साधने व खर्चाचा मेळ घालणे कठीण आहे. कारण योजनेचा आवाका मोठा आहे.
- विकास दर गाठत असताना जगात व भारतात आलेली मंदी यांच्याशी सामना करुन रोजगार वृध्दी कशी करु शकतो .
- भारतात मोठया प्रमाणात २ अंकी महागाईचा दर कमी करता येईल का हा नियोजन कारापुढील मोठा प्रश्न आहे.

# धन्यवाद !

